॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २३ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे कार्यरत असलेल्या विचारधारा प्रशाळाअंतर्गत बहिणाबाई संशोधन केंद्रामार्फत बोलीभाषांच्या प्रचार-प्रसारासाठी विविध उपक्रम राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला. यासाठी संशोधन केंद्राला मिळालेल्या तीन कोटी रुपयांच्या निधीवरील व्याजातून वर्षभर विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

विद्यापीठात झालेल्या या बैठकीस कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, प्रा. म. सु. पगारे, अधिसभा सदस्य ज्ञानेश्वर नारखेडे, प्रा. व्ही. एन. आंधळे, प्रा. आशुतोष पाटील, सीए रविंद्र पाटील तसेच सदस्य सचिव विजय आहेर उपस्थित होते. बैठकीत बहिणाबाईंच्या साहित्याचा वारसा जपण्यासोबतच खान्देशातील बोलीभाषांचा प्रसार करण्यावर विशेष भर देण्यात आला.

संशोधन केंद्राच्या माध्यमातून लेवा गणबोली साहित्य संमेलन आयोजित करण्याबरोबरच इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी बहिणाबाईंच्या कवितांवर आधारित माहितीपर बुकलेट्स वितरित करण्यात येणार आहेत. तसेच बहिणाबाईंच्या कविता, भावकविता, भावगीत, गझल आणि स्त्रीवादी जाणीवांशी संबंधित साहित्याचे स्वतंत्र खंड प्रकाशित करण्याचाही निर्णय घेण्यात आला. तसेच विद्यापीठ परिसरात बहिणाबाईंच्या कवितांतील निवडक कडवी दर्शनी भागात प्रदर्शित करण्यासोबतच त्यांच्या साहित्यावर आधारित म्युझियम उभारण्याची योजना, विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये अभ्यासिकांचे नियोजन करण्यासोबतच कीर्तन, चिंतन आणि व्याख्यानमाला आयोजन, कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा वारसा समाजापुढे आणि विशेषतः शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने "ट्रेन द टीचर" ही संकल्पना राबविण्याबाबतही चर्चा झाली. या अंतर्गत जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील जिल्हा परिषद तसेच अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांसाठी विद्यापीठ परिसरात एक दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्याचा प्रस्ताव आहे. या चर्चासत्रात सहभागी शिक्षकांना बहिणाबाईंच्या जीवनावर आधारित साहित्य देण्यात येणार असल्याचेही बैठकीत ठरविण्यात आले.

याशिवाय विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी खान्देशी संस्कृती, बोलीभाषा, महिला सक्षमीकरण, मराठी स्त्रियांच्या कविता तसेच भारतीय भाषांमधील स्त्रीकवितांवर संशोधन करण्यासाठी "कवयित्री बहिणाबाई संशोधन सहाय्य योजना" राबविण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या विषयांवर संशोधन करणाऱ्या संशोधकांना भरीव आर्थिक सहाय्य देण्याचाही प्रस्ताव आहे.

भविष्यात लेवा गणबोली साहित्य संमेलन, बहिणाबाईंच्या जीवनावर आधारित संगीत-नाट्य प्रयोग तसेच त्यांच्या भावगीतांचे ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग अशा विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. या सर्व कार्यक्रमांसाठी विद्यापीठामार्फत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना व नियमावली लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २३ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आरोग्य केंद्र व फायझर (Pfizer) कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने महिला कर्मचारी व विद्यार्थिनींसाठी रक्तक्षय (ॲनिमिया) तपासणी व शरीर रचना मूल्यांकन शिबिराचे आयोजन गुरुवार, २३ एप्रिल रोजी करण्यात आले. या शिबिराला विद्यापीठातील महिला कर्मचारी व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिरामध्ये एकूण ९० महिला कर्मचारी व विद्यार्थिनींची रक्तक्षय तपासणी तसेच शरीर रचना मूल्यांकन तपासणी करण्यात आली. महिलांमध्ये वाढत चाललेल्या रक्तक्षयाच्या समस्येबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

शिबिराचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या प्रसंगी कंपनीचे वैद्यकीय प्रतिनिधी विलास राजहंस, टेक्निशियन अनिल पवार,एकता तोलानी, तसेच बीसीए टेक्निशियन उपस्थित होते. तर विद्यापीठ आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सारंग, शिवराम खाचणे, डॉ. रोशनी पाटील, कर्मचारी बाळासाहेब पाटील, बलभीम गिरी, प्रशांत साळुंखे आदी उपस्थित होते.

या शिबिरात सहभागी झालेल्या महिलांची हिमोग्लोबिन पातळी तपासण्यात आली तसेच शरीरातील चरबीचे प्रमाण, स्नायूंचे प्रमाण, वजन आदी घटकांचे मूल्यांकन करण्यात आले. तपासणीनंतर संबंधितांना आवश्यक त्या आरोग्यविषयक सूचना देण्यात आल्या.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २३ एप्रिल, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता